# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 03/03/2023 (शुक्रवार) सकाळ

## पोलीस स्टेशन खापा हद्दीतील पेंढरी शिवार येथे अवैध्य दारू भट्टीवर छापा एकुण ८५,२००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक ०२/०३/२०२३ रोजी पो.स्टे खापा हद्दीतील पेंढरी शिवारातील नाल्याजवळ असलेले बंधारा जवळ मोठया प्रमाणावर अवैध मोहाफुल गावठी दारू तयार करून आजुबाजुचे परिसरात विक्री करणार असल्याची गोपनीय खबर स्थानिक गुन्हे शाखा येथील स्टाफला मिळाल्याने मा. पोलिस अधीक्षक श्री. विशाल आनंद, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे नेतृत्वाखाली दि. ०२/०३/२०२३ रोजी १६.०० वा. दरम्यान पोलिस स्टेशन खापा हद्दीतील पेंढरी शिवारातील नाल्याजवळ असलेले बंधारा जवळ फरार आरोपी नामे— सिताराम वसंता गजभिये, रा. निमतलाई ता. सावनेर या नावाचा इसम दगड विटाच्या चुलीवर अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची भट्टी तयार करून दारू गाळत असल्याबाबत गोपनिय बातमी मिळाल्यावरून स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण येथील स्टाफने नमुद घटनास्थळी अवैध मोहाफुल दारू भट्टीवर छापे मारून एकुण किंमती ८५,२००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध पोलिस स्टेशन खापा येथे कलम ६५(B)(C)(E)(F) म. दा. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन कारवाई दरम्यान १) चार नग निळया रंगाचे प्लास्टीक ड्रम प्रत्येकी २०० लिटर मोहाफुल रसायन सडवा असा एकुण ८०० लिटर प्रती लिटर ८०/—रू. असा एकुण ६४,०००/—रूपयाचा मुद्देमाल.

२) २० लिटर मोहाफुल गावठी दारू प्रती १००/—रू लिटर प्रमाणे असा एकुण २०००/—रू

३) निळया रंगाचे चार खाली ड्रम प्रत्येकी ४०००/—रू

४) दोन नग लोखंडी ड्रम मध्ये मोहाफुल रसायन सडवा प्रत्येकी ५० लिटर असे दोन ड्रम मध्ये १०० लिटर प्रत्येकी १००/—रू असा एकुण १००००/—रू

५) २ नग लोखंडी ड्रम प्रत्येकी १०००/—रू असा एकुण २०००/—रूपयाचा मुद्देमाल

६) १ टन जळावू लाकुड किंमती १०००/—रू

७) २ प्लास्टीक डपकी एकुण किंमती २००/—रू

८) ईतर गाळण्याचे साहीत्य पाईप २ जर्मन घमीले व स्टील ताटी असा एकुण किंमती २०००/—रू असा एकुण किंमती ८५,२००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून मोहाफुल गावठी दारूच्या भट्टया उद्धवस्त करण्यात आल्या आहे. जप्त मुद्देमाल पुढील कायदेशिर कारवाईकरीता पोलीस स्टेशन खापा यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार राजू रेवतकर, पोलीस नायक किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, आशिष मुंगळे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर